स्थायी समितीच्या **गुरूवार दिनांक 21/05/2015** रोजी **सायंकाळी 05.00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 5. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 6. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 7. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 8. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 9. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 10. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 11. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 4. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 54:— आयुक्त, महानगरपालिका, नागपूर दिनांक 25.05.2015 ते 06.06.2015 पर्यंत वैयक्तिक कामाकरीता अर्जीत रजा घेण्याचे व ती मंजूर करण्याचे विनंती अर्ज स्थायी समिती समोर सादर केलेला आहे. रजेच्या मागे व पुढे येणाऱ्या शासकीय सुटयांसह प्रस्तावित केलेला रजेचा कालावधी व मुख्यालय सोडण्याची परवानगीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कमल 38 अन्वये प्रस्तावित अर्जीत रजा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित दिनांक 25.05.2015 ते 06.06.2015 अर्जीत रजा

एकमताने मंजूरी प्रदान करते तसेच कलम 38 अन्वये आयुक्ताला अनुपस्थिती रजा मंजूरीचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 55:— डिफेन्स सर्विसेस संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांना नागपूर शहरात विविध ठिकाणी 24901 मी. लांबीच्या ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याकरिता म.न.पा.च्या केबल डक्ट गाईड लाईन्सनुसार सुपरव्हिजन चार्जेस (ROW) न आकारता परवानगी देण्याबाबतचा विषय स्थायी समितीचे नोंदीकरिता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन महानगर पालिकेचे प्रचलीत दरांत (ROW) ही स्थायी समिती सुट नाकारते, विभागाने प्रचलित दरानुसार शुल्क आकारावे, भविष्यात राज्य शासनाने, आयुक्त, महानगरपालिका यांना सुट देण्यास विनंती केल्यास यावर ही स्थायी समिती या निर्णयावर फेरविचार करेल या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

- संरक्षण मंत्रालय भारत सरकार यांनी डिफेन्स सर्विसेसकरिता ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याचे ठरविले आहे.
- महाराष्ट्र राज्यात एकुण 60,000 कि.मी. लांबीच्या ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्यात येणार आहे.
- नागपूर शहर सिमेअंतर्गत एकूण 24901 मी. लांबीच्या ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याचे नियोजीत आहे. याबाबत सविस्तर माहिती खालील तक्त्यात नमुद नुसार आहे.

| अ. क्र. | स्थळ | HDD ची लांबी | ओपन ट्रेन्चींग ची लांबी |
|---|---|---|---|
| 1 | कामठी नाका ते आटोमोटीव्ह चौकापर्यंत | 2401 मी. | 00.00 मी |
| 2 | आटोमोटीव्ह चौक ते इंदोरा चौक ते कडबी चौक ते गड्डीगोदाम चौक ते एल. आय. सी. चौक ते जयस्तंभ चौक ते गणेश मंदीर ते जयस्तंभ चौक ते श्री मोहीनी कॉम्प्लेक्स चौक ते 118 बटालीयन ते आर. बी. आय. चौक ते सी.डब्ल्यु ई नागपूर ऑफिस पर्यंत | 4326 मी. | 3664 मी. |
| 3 | आटोमोटीव्ह चौक रिंग रोड ते कामगार नगर चौक ते सुगत नगर चौक ते जरिपटका चौक ते मानकापूर रिंगरोड चौक ते बोरगांव चौक ते काटोल नाका चौक ते वृदांवन कॉलोनी टर्निंग काटोल रोड पर्यंत | 5743 मी. | 4300 मी. |
| 4 | वृदांवन कॉलोनी टर्निंग काटोल रोड ते | 00.00 मी. | 4467 मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | फायर कॉलेज ते प्रेरणा कॉलोनी चौक ते फ्रेंडस कॉलोनी घाट ते इंडियन एअर फोर्स ऑफिस बॉटनिकल गार्डन पर्यंत | | |
| | एकुण | 12470 मी. | 12431 मी. |

सदर तक्त्यामध्ये नमुदनुसार 12470 मी. लांबीच्या ऑप्टीकल फायबर केबल (OFC) HDD (Horizontal Directional Drilling) पध्दतीने टाकण्याचे असून उर्वरित 12431 मी. लांबीचे ऑप्टीकल फायबर केबल (OFC) Open Trenching पध्दतीद्वारे टाकावयाचे आहे.

- प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र. GAD - मातंस 065 /184/2014—0/0 दि. 4 फेब्रुवारी 2015 अनुसार ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याचे कामाकरिता ROW चार्जेस Waive Off व 2 Mbps Connectivity स्थानिक संस्थेला पुरविण्याची अट देखील शिथील केलेली आहे. यानुसार डिफेन्स सर्विसेस संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांना 24901 मी. लांबीच्या ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याकरिता रू. 1,85,51,245/— राशी ROW चार्जेस म्हणुन भरण्यास सुट दयावयाची आहे.
- मात्र सदर ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याचे काम व्यवस्थितपणे पार पाडण्याचे अनुषंगाने तसेच मनपाच्या जमीनीखालील नागरी सुविधा क्षतिग्रस्त झाल्यास दुरूस्त करून घेण्याचे दृष्टीने विभागाद्वारे या कामाकरिता रू. 9,20,09,195/— राशीची सुरक्षा ठेव बँक गॅरंटीच्या स्वरूपात आकारण्यात येत आहे.
- ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याचे कामामुळे नागपूर शहरातील नागरिकांची गैरसोय होवू नये याकरिता केबल डक्ट गाईड लाईन्सनुसार मनपाच्या इतर अटी व शर्तीनुसार काम करण्याची परवानगी देण्यात येईल. सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. 02.05.2015 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच सदर प्रस्ताव वरीलप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे निर्देशाप्रमाणे ROW चार्जेस मध्ये सुट देण्यात येत असल्याने स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देण्याचे कळविले आहे.

<u>ठराव क्रमांक 56</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती तयार करून वर्तमानपत्र, रेडीओ व टि.व्ही. इ. प्रसार माध्यमांमार्फत प्रसारित करण्याकरीता जाहिरात एजन्सी नियुक्त करण्यासाठी प्राप्त झालेल्या एकूण चार निविदांपैकी मे.प्रॉफीट ॲडव्हरटायझर्स (इंडीया) प्रा.लि. नागपूर यांनी जाहिरातीवर देवू केलेली पाच टक्के सुट विचारात घेवून जनसंपर्काचे काम निःशुल्क करावे लागेल या अटीवर त्यांची निविदा मंजूर करून प्रथम एक वर्षाकरीता कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन 10.50 टक्के सुट देण्याच्या अटीसह निविदेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 57</u>:— शासन निर्णय क्र. नामपा—2308—680—प्र.क्र. 358—नवि—26, दि. 01.04.2009 व शासन निर्णय क्रमांक नामपा — 2308—680—प्र.क्र.—358—नवि—26, दिनांक 08.09.2010 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमशः नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधी 2009 व दुरूस्ती उपविधी 2010 च्या कलम 56(ब) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत आयुक्त, म.न.पा. यांनी सोबत सहपत्र —1 वर जोडलेल्या आदेश क्रमांक एम.सी./66/2015, दिनांक 10.04.2015 अन्वये मंजुर केलेले व दिनांक 01. 04.2015 पासून लागू केलेल्या सुधारीत दरांची माहिती स्थायी समितीपुढे ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन समितीने एकमताने नोंद घेतली.

<u>ठराव क्रमांक 58</u>:— नागपूर शहरातील प्रमुख रस्ते, मैदाने इत्यादी ठिकाणी बसविण्यात आलेले सोडीयम व्हेपर/मेटल हलाईड पथदिवे ऊर्जा कार्यकुशल एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलण्याचे देण्यात आलेल्या कामामधे अंर्तभूत पथदिवे वगळता उर्वरीत १,००,०२६ पथदिवे ऊर्जा कार्यकुशल एल.ई.डी. पथदिव्यांनी यावरील खर्च ऊर्जा बचतीच्या रकमेतून वळता करण्याच्या धर्तीवीर बदलणे. (या कामाकरीता अपेक्षीत खर्चाची रक्कम रु. १३०.०३ कोटी आहे, व अस्तित्वात असलेले पथदिवे बायबॅक पोटी रु. ७.२४ कोटी नागपूर महानगरपालिकेस प्राप्त होण्याची अपेक्षा आहे) व या अनुषंगाने ऊर्जाबचतीतून किती हिस्सा निविदाकारास हवा आहे व किती हिस्सा ते नागपूर महानगरपालिकेला देण्यास तयार आहेत अश्या पर्यायासह तसेच याकरीता परतफेडीची रक्कम निविदाकारास ४० दिवसांच्या कालावधीत देण्याची हमी देऊन निविदा मागविण्यास व परतफेडीचा जो कालावधी निविदेमधे प्राप्त होईल अश्या कालावधीकरीता असे कंत्राट देण्यास नागपूर महानगरपालिकेच्या महासभेची मंजूरी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने महासभेपुढे प्रस्ताव ठेवण्यास तसेच अस्तित्वात असलेले पथदिवे 'बायबॅक' करीता या निविदेमधे दर मागविण्यास तसेच हे पथदिवे ज्या यंत्रणेमधे आहेत त्या यंत्रणेतील निकामी केबल्स् बदलणे, तुटलेल्या खांबांच्या जागी नविन खांब बसविणे, फिडबॅक देणारे पॅनल्स बसविणे इत्यादी कामांकरीता येणारा रु. ३२.७३ कोटी च्या कामाकरीता निविदेमधे दर मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा तसेच या कंत्राटाच्या कालावधीमधे या पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करण्याकरीता आवश्यक मनुष्यबळ, शिडीयुक्त वाहने याचा वापर करुन या कालावधीमधे ही देखभाल दुरुस्ती करण्याच्या कामाकरीताही निविदेमधे दर मागविण्यास तसेच वर नमूद कामांव्यतिरिक्त संपूर्ण कंत्राटाच्या कालावधीमधे जे साहित्य देखाभाल दुरुस्ती करीता आवश्यक राहील किंवा साहित्याचा पुरवठा करणे, बसविणे कार्यान्वयन करणे आवश्यक राहील अश्या कामाकरीता दरकरार करण्यास निविदेमधे दर मागविण्यास व या सर्व निविदा झोननिहाय कामास्तव मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावित विषयातील काम हे संपूर्ण शहरामध्ये उर्जा कार्य—कुशल एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलण्याचे कार्य असुन फक्त एकाच निविदाकारास/कंत्राटदारास देण्यात येऊ नये. तसेच क्षेत्रीय कार्यालय निहाय वेगवेगळया निविदा काढाव्या यांची दक्षता प्रशासनाने घ्यावी. जेणे करुन या कामात स्पर्धात्मक दर प्राप्त होतील, असे स्थायी समितीचे मत आहे. व यामुळे प्रस्तावित काम सुध्दा लवकरात लवकर व गतीशिल होईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी, व उद्देश विभागाने ठेवून निविदा काढाव्या. हि धोरणात्मक बाब असल्यामुळे म.न.पा. सभागृहाची मंजूरी आवश्यक राहील या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 59</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर